महाराष्ट्र शासन,

# अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे.

वरदान संकुल, ९ वा मजला, एम.आय.डी.सी.कार्यालयासमोर, वागळे इस्टेट,
रोड नं.१६, ठाणे (प) ४००६०४.

दूरध्वनी क्र.२५८२ ३५ २८/ २५८० ०६ ३७ फॅक्स क्र.२५८३ ३८ २२

E_mail : atcthane@yahoo.co.in

## जाहिरात

**अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे** हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील शहापूर, जव्हार, डहाणू, जि. ठाणे, घोडेगाव, जि. पुणे, पेण, जि. रायगड या प्रकल्पांतर्गत असलेल्या शासकीय आश्रम शाळांतील खालील शिक्षक संवर्गाची (शिक्षण सेवक) रिक्त पदे भरण्याकरिता पात्रता धारक उमेदवारांकडुन विहित नमुन्यातील अर्ज मागवित आहेत.

| पदाचे नाव | विषय सांकेतांक | अ.क्र. | माध्यम | पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १) प्राथमिक शिक्षण सेवक | PTM | १ | मराठी माध्यम | ६८ |
| | PTE | २ | इंग्रजी माध्यम | १० |
| | | | एकुण | ७८ |
| २) माध्यमिक शिक्षण सेवक | | अ.क्र. | विषय | |
| | STM | १ | गणित | १६ |
| | STE | २ | इंग्रजी | १३ |
| | STS | ३ | विज्ञान | १२ |
| | | | एकुण | ४१ |
| ३) उच्च माध्यमिक शिक्षण सेवक | | अ.क्र. | विषय | |
| | HSTM | १. | मराठी | ०४ |
| | HSTE | २. | इंग्रजी | ०४ |
| | HSTEco | ३. | अर्थशास्त्र | ०५ |
| | HSTH | ४. | इतिहास | ०१ |
| | HSTG | ५. | भूगोल | ०२ |
| | HSTMath | ६. | गणित | ०२ |
| | HSTB | ७. | जीवशास्त्र | ०१ |
| | | | एकुण | १९ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांची संख्या | | प्राथमिक शिक्षण सेवक ७८ पदे | | | | | | | |
| पदाचे स्वरुप | | अस्थायी | | | | | | | |
| पदाच्या आरक्षणाचा तपशिल | | | | | | | | | |
| अ) अनुशेष पदांची संख्या | | पद संख्या | महिला | अपंग | मा.से. | खेळाडू | अंशकालीन कर्मचारी | प्रकल्प-ग्रस्त | इतर |
| ०१ | अनुसूचित जाती | ७ | २ | ० | १ | ० | ० | ० | ४ |
| ०२ | अनुसूचित जमाती | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ०३ | वि.जा.(अ) | १० | ३ | ० | १ | ० | ० | ० | ६ |
| ०४ | भ.ज. (ब) | ४ | १ | ० | १ | ० | ० | ० | २ |
| ०५ | भ. ज. (क) | ९ | ३ | ० | १ | ० | ० | ० | ५ |
| ०६ | भ. ज. (ड) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ०७ | इ.मा.व. | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ०८ | वि.मा.प्र. | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| ०९ | खुला | ३९ | १२ | १ | ६ | २ | ० | २ | १६ |
| | एकूण | ७८ | २३ | १ | १० | २ | ० | २ | ४० |

| नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांची संख्या | | माध्यमिक शिक्षण सेवक ४१ पदे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदाचे स्वरुप | | अस्थायी | | | | | | | |
| पदाच्या आरक्षणाचा तपशिल | | | | | | | | | |
| अनुशेष पदांची संख्या | | पद संख्या | महिला | अपंग | मा.से. | खेळाडू | अंशकालीन कर्मचारी | प्रकल्प-ग्रस्त | इतर |
| ०१ | अनुसूचित जाती | ६ | २ | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| ०२ | अनुसूचीत जमाती | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| ०३ | वि.जा.(अ) | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ०४ | भ.ज. (ब) | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ०५ | भ. ज. (क) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ०६ | भ. ज. (ड) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ०७ | इ.मा.व. | ५ | १ | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| ०८ | वि.मा.प्र. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ०९ | खुला | २० | ६ | १ | ३ | १ | ० | १ | ८ |
| | एकूण | ४१ | १० | १ | ३ | १ | ० | १ | २५ |

| नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांची संख्या | | उच्च माध्यमिक शिक्षण सेवक १९ | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदाचे स्वरुप | | अस्थायी | | | | | | | |
| पदाच्या आरक्षणाचा तपशिल | | | | | | | | | |
| अनुशेष पदांची संख्या | | पद संख्या | महिला | अपंग | मा.से. | खेळाडू | अंशकालीन कर्मचारी | प्रकल्प-ग्रस्त | इतर |
| ०१ | अनुसूचित जाती | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ०२ | अनुसूचीत जमाती | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ०३ | वि.जा.(अ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ०४ | भ.ज. (ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ०५ | भ. ज. (क) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ०६ | भ. ज. (ड) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ०७ | इ.मा.व. | ४ | १ | ० | १ | ० | ० | ० | २ |
| ०८ | वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ०९ | खुला | ११ | ३ | ० | २ | १ | ० | १ | ४ |
| | एकूण | १९ | ४ | ० | ३ | १ | ० | १ | १० |

टिप:- वर नमुद केलेल्या पद संख्येत तसेच आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो.

<table>
<tr><td colspan="2">पद ज्या वर्गातील व सेवेतील असेल तो वर्ग व ती सेवा:</td><td>वर्ग- ३</td></tr>
<tr><td colspan="2">शिक्षण सेवक कालावधी असल्यास</td><td>शिक्षण सेवक कालावधी ३ वर्षाचा आहे</td></tr>
<tr><td colspan="2">नोटीस देऊन नियुक्ती समाप्त करण्यात येते काय, असल्यास, कोणत्या शर्तीवर ?</td><td>होय, नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार नियुक्ती समाप्त करण्यात येते.</td></tr>
<tr><td colspan="2">(अ) कर्तव्य</td><td>नियमानुसार.</td></tr>
<tr><td colspan="2">(ब) उमेदवारांना जेथे सेवा करावी लागेल त्या कार्यालयाचे/कार्यालयांचे ठिकाण/ ठिकाणे</td><td>अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे विभागातील शहापुर/जव्हार/डहाणु/घोडगांव/पेण या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेल्या निवासी शासकीय आश्रमशाळा</td></tr>
<tr><td colspan="2">निवडण्यात आलेल्या उमेदवारांना कामावर केव्हा यावे लागेल ?</td><td>नियुक्ती आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत</td></tr>
<tr><td colspan="2">मानधन (नियुक्तीपासून ३ वर्षासाठी ) त्यानंतर कामकाज समाधानकारक आढळल्यास नियमित वेतनश्रेणी लागू होईल.</td><td>प्राथमिक शिक्षण सेवक :- ३०००/-<br>माध्यमिक शिक्षण सेवक :- ४०००/-<br>उच्च माध्यमिक शिक्षण सेवक :- ५०००/-<br>मानधन (प्रतिमाह)</td></tr>
<tr><td colspan="2">पदोन्नतीच्या संधी</td><td>शासन नियमानुसार</td></tr>
<tr><td colspan="2">आवश्यक अर्हता</td><td>खालीलप्रमाणे</td></tr>
<tr><td rowspan="2">प्राथमिक शिक्षण सेवक</td><td>मराठी माध्यम</td><td>एच.एस.सी., डी.एड</td></tr>
<tr><td>इंग्रजी माध्यम</td><td>एच.एस.सी., डी.एड.(उमेदवारांचे शिक्षण इ.१ ली पासून डी.एड.पर्यत इंग्रजी माध्यमातून झालेले असावे).</td></tr>
<tr><td rowspan="3">माध्यमिक शिक्षण सेवक</td><td>इंग्रजी</td><td>बी.ए.(इंग्रजी विषय घेऊन), बी.एड. ला इंग्रजी विषयाची अध्यापन पध्दती आवश्यक.</td></tr>
<tr><td>गणित</td><td>बी.एस्सी.(गणित), बी.एड. ला गणित विषयाची अध्यापन पध्दती आवश्यक ( A –Group PCM)</td></tr>
<tr><td>विज्ञान</td><td>बी.एस्सी.(विज्ञान), बी.एड. ला विज्ञान विषयाची अध्यापन पध्दती आवश्यक ( B -Group PCB)</td></tr>
<tr><td rowspan="6">उच्च माध्यमिक शिक्षण सेवक</td><td>इंग्रजी</td><td>एमए. ( इंग्रजी Entire ) द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक, बीएड ला इंग्रजी अध्यापन पध्दती द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक दुस-या विषयांचे अध्यापन करण्यासाठी पदवी परीक्षा इतिहास/भूगोल/अर्थशास्त्र / राज्यशास्त्र/समाजशास्त्र हे विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक.</td></tr>
<tr><td>गणित</td><td>एम.एस्सी. गणित द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक, बीएड ला गणित विषयाची अध्यापन पध्दती द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक, दुस-या विषयांचे अध्यापन करण्यासाठी पदवी परीक्षा भौतीक शास्त्र/रसायनशास्त्र हे विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक.</td></tr>
<tr><td>जीवशास्त्र</td><td>एम.एस्सी. (जीवशास्त्र/प्राणीशास्त्र/वनस्पतीशास्त्र) द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक, बीएड ला संबंधीत विषयाची अध्यापन पध्दती द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक, दुस-या विषयांचे अध्यापन करण्यासाठी पदवी परीक्षा भौतीक शास्त्र/रसायनशास्त्र हे विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक.</td></tr>
<tr><td>अर्थशास्त्र</td><td>एम.ए.(अर्थशास्त्र) द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक, बीएड ला संबंधीत विषयाची अध्यापन पध्दती द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक, दुस-या विषयांचे अध्यापन करण्यासाठी पदवी परीक्षा इतिहास/भूगोल/समाजशास्त्र/ राज्यशास्त्र हे विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक.</td></tr>
<tr><td>इतिहास</td><td>एम.ए.- इतिहास द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक, बीएड ला संबंधीत विषयाची अध्यापन पध्दती द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक, दुस-या विषयांचे अध्यापन करण्यासाठी पदवी परीक्षा भूगोल/समाजशास्त्र/राज्यशास्त्र हे विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक.</td></tr>
<tr><td>मराठी</td><td>एम.ए.( मराठी) द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक, बीएड ला मराठी विषयाची अध्यापन पध्दती द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक, दुस-या विषयांचे अध्यापन करण्यासाठी पदवी परीक्षा इतिहास/अर्थशास्त्र/ भूगोल/ समाजशास्त्र/राज्यशास्त्र हे विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक.</td></tr>
<tr><td colspan="2">कोणतीही इतर अर्हता</td><td>एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. उत्तीर्ण नसल्यास सेवेत रुजू झाल्यापासून दोन वर्षात सदर परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.</td></tr>
<tr><td colspan="2">समान अर्हतेचा स्वीकार करता येईल काय अशा अर्हता कोणत्या ?</td><td>नाही</td></tr>
<tr><td colspan="2">वयोमर्यादा (कोणतीही असल्यास)</td><td>शासन नियमानुसार सर्वसाधारण उमेदवारासाठी ३३ वर्षे, मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षे , अपंग/माजी सैनिक/खेळाडू/अपंग/प्रकल्पग्रस्त व अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठी शासन नियमानुसार शिथीलक्षम/ माजी सैनिकांना वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.</td></tr>
<tr><td colspan="2">राष्ट्रीयत्व</td><td>भारतीय</td></tr>
<tr><td colspan="2">अधिवास</td><td>महाराष्ट्र</td></tr>
</table>

प्राथमिक शिक्षण सेवक, माध्यमिक शिक्षण सेवक, उच्च माध्यमिक शिक्षण सेवक या पदांसाठी शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणी / वापराबाबतचे प्रमाणपत्र धारण करणेसंबधी केलेल्या अथवा भविष्यात केल्या जाणाऱ्या नियमानुसार धारण करणे आवश्यक राहील.

**उमेदवार निवडीची पध्दती :-**

१. पद क्र. १ ते ३ साठी मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौध्दीक चाचणी व अध्यापन ज्ञान चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरिता एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा असेल. प्राथमिक शिक्षण सेवक, माध्यमिक शिक्षण सेवक, उच्च माध्यमिक शिक्षण सेवक पदांकरीता प्रश्नपत्रिका वेगवेगळी राहील.
२. पद क्रं. १ मधील इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शिक्षण सेवकासाठी लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका केवळ इंग्रजी भाषेत राहतील. उर्वरीत पदासाठी (पद क्रमांक १ ते ३) साठी लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका केवळ मराठी भाषेत राहतील.
३. शासन नियमाप्रमाणे गुणवत्ता यादी अंर्तभाव करण्यासाठी उमेदवाराने लेखी परीक्षेत एकुण गुणाच्या किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

***--अर्ज करण्याची पध्दत व सर्वसाधारण सूचना--***

१. जाहिरातीत विहित केलेल्या नमून्यात अर्ज करावा. अपूर्ण अर्ज किंवा उमेदवाराची स्वाक्षरी नसलेला अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
२. सर्व शैक्षणिक अर्हता, जन्म तारखेचा पुरावा ,जातीचा दाखला इ.प्रमाणपत्राच्या सत्यप्रती स्वाक्षांकित करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. मुळ प्रती सोबत जोडू नयेत.
३. परिपूर्ण स्थितीत भरलेले अर्ज लिफाफ्यात बंद करुन लिफाप्यावर ठळक अक्षरात पदाचे नांव व विषयाचा सांकेतांक क्रमांक नमूद करुन उमेदवारांनी अपर आयुक्त, आदिवासी विकास, वरदान व्यापारी संकुल, ९ वा मजला, एम.आय.डी.सी. कार्यालयासमोर , रोड क्रमांक १६, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) या पत्यावर **दि. १४ जून, २०११ अखेर सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अथवा त्यापूर्वी** पोहोचतील अशा रितीने केवळ पोस्टाने पाठविण्यांत यावेत. कोणत्याही कारणाने उशिरा आलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही. विहित दिनांकानंतर पोष्टाद्वारे प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
४. उमेदवारांस मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक आहे.
५. लेखी परिक्षेसाठी व मुलाखतीसाठी उमेदवाराला स्वखर्चाने यावे लागेल.
६. निवड झालेल्या उमेदवारांनी या विभागातील कार्यक्षेत्रांतर्गत असलेल्या जिल्हयातील कोणत्याही आश्रमशाळेत नियुक्ती दिली जाईल. या विभागाच्या आश्रमशाळा निवासी असल्याने उमेदवारास मुख्यालयी राहणे बंधनकारक राहील.
७. अनुसूचित जाती/जमाती व इतर मागासवर्गीय उमेदवारांची निवड झाल्यावर उमेदवाराने अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांचे कार्यालयात जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय त्यांच्या नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.
८. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विमुक्त जाती / भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९.१.२००४ पासून अमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे तत्त्व (क्रिमीलेअर) वि.जा. अ, भ.ज. (ब/क/ड) इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१०-११ या कालावधीतील (नॉन-क्रिमिलेअर) प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.
९. महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्र. ८२/२००१/मसेआ/२०००/ प्रक्र-४१५/ का-२ दिनांक २५.५.२००१ मधील तरतूदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्तिगट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे सन २०१०-११ या कालावधीतील नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र जवळ असणे आवश्यक आहे.
१०. अंशकालीन कर्मचाऱ्यांना त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. अर्जामध्ये सेवायोजन कार्यालयाकडील नोंदणी क्रमांकाचा उल्लेख करुन नोंदणीपत्राची छायांकित प्रत अर्जासोबत जोडावी. शासन निर्णय दिनांक १९.३.१९९८ नुसार अंशकालीन काम केलेल्या उमेदवारांना विहित अटी पूर्ण करीत असल्यास नियमानुसार गुण देण्यात येतील. सदरचे गूण उमेदवारास मिळालेल्या लेखी गुणांमध्ये समाविष्ट केले जातील. उमेदवाराने अर्जामध्ये अंशकालीन सेवेसंबंधी माहिती नमुद न केल्यास त्यास या शासन निर्णयाचा फायदा मिळणार नाही.
११. उमेदवार माजी सैनिक असल्यास सैनिक कल्याण बोर्डामध्ये नांव नोंदणी केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
१२. भुकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्त उमेदवारांने जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले उमेदवाराचे नांव नमुद केलेले प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.
१३. जाहिरातीत दिलेल्या पदांची संख्या कमी अथवा जास्त होऊ शकते. त्यामुळे वरील आरक्षणाच्या पदामध्ये बदल होऊ शकतो.
१४. निवड झालेल्या उमेदवारांना रुजू झाल्याच्या दिनांकापासून किमान १० वर्षापर्यंत विभाग बदलीने अथवा इतर खात्यात विनंती बदलीने जाता येणार नाही.
१५. उमेदवाराने अर्जासोबत जोडलेल्या गुणपत्रिका /प्रमाणपत्र व दस्तऐवजांच्या प्रती राजपत्रित / सक्षम अधिकाऱ्यांने स्वाक्षांकित केलेले असणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१६. अर्जात चुकीच्या किंवा अपूर्ण नोंदी असल्यास व योग्य पात्रताधारक नसल्याचे आढळून आल्यास असा अर्ज विचारात घेतला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१७. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

१८. अपंग प्रवर्गातील उमेदवारांजवळ किमान ४० टक्के अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सकांनी दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१९. शासन निर्णय क्र.अनिओ-१००५/१२६/सेवा ४ दि.३१/१०/०५ व १/१/०५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू ठरेल. सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू राहणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार मानधन / वेतन व भत्ते मिळतील

२०. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडूसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग व क्रिडा विभाग क्र.रक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२ दिनांक ३०/४/०५ मधील तरतूदीनसार राहील. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडूसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. खुल्या प्रवर्गातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ( शासन निर्णय परिशिष्ट -अ मधील नमूद ) खेळाचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे असले पाहिजे.

२१. शासन परिपत्रक क्र.न्याय-२००७/स.न्या./प्र.क्र.१०३/(भाग-३)/१६-अ दिनांक १९/१०/०७ नुसार अपंगाची आरक्षित पदे सामाजिक प्रवर्गात न दर्शविता, ती स्वतंत्रपणे दर्शविण्यात आलेली आहेत. निवड झालेल्या उमेदवारांना ते ज्या वैधानिक आरक्षणाच्या प्रवर्गातील असतील त्याच प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घेण्यात येईल.

२२. उमेदवाराने जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांचा बारकाईने अभ्यास करावा. उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती बरोबर आहे असे गृहित धरुन कोणत्याही टप्प्यावर पडताळणीच्या अधिन राहून अर्ज स्विकृत करण्यात येतील. उमेदवाराने ज्या पदांसाठी अर्ज केला आहे त्या पदासाठी आवश्यक त्या सर्व अर्हता /आरक्षण उमेदवार धारण करित नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

२३. पात्र उमेदवारांच्या लेखी परिक्षा दि.२४/७/२०११ रोजी घेण्यात येतील. परीक्षेची वेळ व ठिकाण प्रवेश पत्राव्दारे कळविण्यांत येईल.

२४. उमेदवारांच्या पद निहाय लेखी परीक्षा एकाच दिवशी घेण्यात येतील.

२५. आादिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक आस्था १०९९/ प्रक्र १०१/ का-१५ दिनांक १७ नोव्हेंबर २००५ अन्वये गठीत केलेल्या निवड समितीमार्फत पात्रता धारकांची निवड करण्यात येईल.

२६. पात्र ठरलेल्या उमेदवारांना अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांचेकडुन नियुक्ती आदेश देण्यात येतील.

२७. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. पी.आर. ई २००२/३३९५/ प्राशि-१ दिनांक २७ फेब्रुवारी २००३ अन्वये राज्यात सुधारित प्राथमिक शिक्षण सेवक योजना कार्यान्वित करण्यात आली असुन सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार शिक्षण सेवकाचा कालावधी हा तीन वर्षे इतका राहील.

२८. परीक्षा शुल्क म्हणून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रुपये ४००/- व मागासवर्गीय उमेदवारांनी रुपये २००/- चे धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) (फक्त स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेच) च्या स्वरुपात अर्जा सोबत पाठविणे आवश्यक आहे. धनाकर्ष सहायक आयुक्त (वित्त), आदिवासी विकास, ठाणे यांचे नांवे काढण्यात यावा. अन्य बँकेचा धनाकर्ष विचारात घेतला जाणार नाही. **माजी सैनिकांना आवेदन शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.**

२९. जाहिरातीत दर्शविलेले आरक्षण हे विषयनिहाय नसून संवर्गनिहाय (पदनिहाय) आहे.

३०. उमेदवारांने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये द्यावयाचे प्रतिज्ञापत्र तसेच अर्जातील संपूर्ण माहिती खरी असल्याबाबतची प्रमाणपत्र जाहिरातीसोबत जोडलेले असून सदर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

३१. सदरची जाहिरात आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या www.mahatribal.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द केलेली आहे.

**अपर आयुक्त,**
**आदिवासी विकास, ठाणे.**

# अर्जाचा नमुना

प्रति,
अपर आयुक्त,
आदिवासी विकास,
वरदान संकुल, ९ वा मजला,
एम.आय.डी.सी. कार्यालयासमोर,
वागळे इस्टेट, रोड नं. १६ ठाणे (प)-४००६०४

अर्जदाराने स्वत:चा अलीकडे काढलेला ३.५ सेंमी X ४.५ सेंमी आकाराचा फोटो चिकटवावा

अर्जदाराची स्वाक्षरी

१. अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव :-

२. विषय संकेतांक :-

---

आडनाव नाव वडिलांचे/आईचे/पतीचे नाव

१. अर्जदाराचे नांव
(देवनागरी लिपीत)

Name of Applicant
(In capital letters) Surname First Name Fathers/Mothers/Husband Name

२. अर्जदाराचा पत्ता: ----------------------------------------------------------------------------------------
(देवनागरी लिपीत) ---------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------पिन

Address of Applicant:- --------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------PIN:

३. जन्मतारीख: दिनांक महिना वर्ष वय

४. जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकास ----------- वर्ष -------------- महिना ------------- दिवस
उमेदवाराचे वय

५. लिंग: (१) पुरुष (२) स्त्री

६. अर्जदार विवाहित आहे काय ? (१) होय (२) नाही
(विवाहीत असल्यास हयात अपत्यांची संख्या--------------------)

७. अर्जदाराचा प्रवर्ग (जात): ---------------------------------
अर्जदाराने आपल्या जातीच्या प्रवर्गासाठी खाली दिलेला संकेतांक समोरील चौकोनात लिहावा.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ. | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज. ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |

८. अर्जदार मुद्दा क्र. ७ मधील ३ ते ८ या प्रवर्गातील किंवा ९ मधील फक्त महिला उमेदवार यापैकी असेल तो उन्नत व प्रगत गटातील आहे/ नाही (१) आहे (२) नाही

९. अर्जदार खालील आरक्षणासाठी पात्र आहेत काय ? योग्य तो संकेतांक चौकोनात भरावा
अ) अपंग : १) अल्पदृष्टी २) अस्थिव्यंग ३) कर्णबधीर ४) अपंग नाही

ब) खेळाडू १) होय २) नाही

क) माजी सैनिक (१) माजी सैनिक स्वत: (२) शहिद झालेल्या किंवा कायमचे अपंगत्व सैनिकाची वीरपत्नी अविवाहित मुलगा/अविवाहित मुलगी (३) नाही

...२...

ड) भूकंपग्रस्त:   १) होय   २) नाही

ई) प्रकल्पग्रस्त   १) होय   २) नाही

फ) अंशकालीन उमेदवार   १) होय   २) नाही

१०) अर्जदार स्वातंत्र्यसैनिकाचा पाल्य आहे का ?   १) होय   २) नाही

११) अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय ?   १) होय   २) नाही

१२) प्राथमिक शिक्षण सेवक पदासाठी अर्ज केला असल्यास कोणत्या माध्यमासाठी

१) मराठी   २) इंग्रजी

१५) परीक्षा शुल्काबाबत तपशील-

डी. डी. क्रमांक------------------------------------ दिनांक   /   /२०११   रुपये

बँकेचे नांव-  स्टेट बँक ऑफ इंडिया   शाखा  --------------------------

१६) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | माध्यम | मंडळ/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष व महिना | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस. एस. सी. | | | | | | |
| २ | एच. एस. सी. | | | | | | |
| ३ | डि.एड. | | | | | | |
| ४ | बी.ए./बी.एस्सी./बी.कॉम | | | | | | |
| ५ | बी.एड | | | | | | |
| ६ | एम.ए./एम.एस्सी./एम. कॉम | | | | | | |
| ७ | एम.एड्. | | | | | | |
| ८ | इतर शैक्षणिक अर्हता | | | | | | |

**१७) अर्जासोबत कोणतेही मुळ प्रमाणपत्र जोडू नयेत.**

**स्थळ:-**

**अर्जदाराचे नांव व स्वाक्षरी**

**दिनांक:-**

## प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो / करते की, आदिवासी विकास विभागाची जाहीरात मी काळजीपूर्वक वाचली आणि मला समजली. सदर पदासाठी जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीची मी पूर्तता करतो/करते याची मी खात्री केली आहे. या अर्जात दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास त्याच माहितीच्या आधारे मला निवड प्रक्रियेत दिलेला प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल, परिणामी मिळालेली नोकरी गमविण्यास मी बांधील राहीन व पुढील योग्य त्या कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण :

अर्जदाराची स्वाक्षरी
(दिनांकासह)

---

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये प्रतिज्ञापत्र

मी श्री./श्रीमती ---------------------------------- श्री.-------------------------- यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय ---------- वर्षे, राहणार -------------------------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी---------------------------- या प्रकारातील पदासाठी --------------------------- आदिवासी विभागाकरीता माझा अर्ज दाखल केलेला आहे.
२. आज रोजी मला ------------- (संख्या) इतकी हयात अपत्ये आहेत. यापैकी दि.२८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या ----------- इतकी आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा.)
३. हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या अपत्यांमुळे या पदासाठी मी अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण :

अर्जदाराची स्वाक्षरी

महत्वाची सूचना : १. अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्राच्या छायाप्रती जोडाव्यात. २) उमेदवाराने अर्ज सादर करण्यापूर्वी खालील बाबींची पूर्तता केली आहे याची खातरजमा करुन घ्यावी.

तपासणी सूची :

१. अर्ज : जाहिरातीतील नमुन्यानुसारच आहे.
२. अर्जावर अलिकडील छायाचित्र चिकटविले आहे.
३. अर्जासोबत अर्ज केलेल्या पदाकरीता आवश्यक असलेल्या रकमेचा डी.डी.(स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेचा) सोबत जोडणे आवश्यक आहे.
४. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता व इतर आवश्यक प्रमाणपत्र जोडली आहेत.